सकाळ

# वीरपत्नी महाविद्यालयाचा 'रवळनाथ'शी सामंजस्य करार

## २५ हजारांची देणगी : विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार

सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. ११ : तिटवे (ता. राधानगरी) येथील वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय व श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीमध्ये सामंजस्य करार केला. यानिमित्त महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षणासाठी 'रवळनाथ'तर्फे २५ हजारांची देणगी दिली.



तिटवे : वीरपत्नी महाविद्यालय व 'रवळनाथ'च्या कराराप्रसंगी प्रशांत पालकर, एम. एल. चौगुले, लक्ष्मीबाई पाटील, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. जगन्नाथ पाटील आदी.

वीरपत्नी महाविद्यालयात हा कार्यक्रम झाला. वीरपत्नी लक्ष्मीबाई पाटील अध्यक्षस्थानी होत्या. शहीद शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक डॉ. जगन्नाथ पाटील, शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. दत्ता पाटील, प्रा. रामकुमार सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले म्हणाले, ''रवळनाथ व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी वेळोवेळी प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा घेतल्या जातील. त्याचा गुणवत्ता वाढीसाठी उपयोग होईल. तिटवेसारख्या खेड्यात मुलींसाठी सुरक्षित शैक्षणिक संकूल उभारण्याची शहीद परिवाराची कामगिरी कौतुकास्पद आहे.''

डॉ. जगन्नाथ पाटील म्हणाले, ''रवळनाथ'ची घोडदौड, कार्यपद्धती, सामजिक व शैक्षणिक योगदान अमूल्य आहे. 'रवळनाथ'च्या सहकार्यातून आपले महाविद्यालय शैक्षणिक क्षेत्रात वेगळा मानदंड निर्माण करेल.'' प्राचार्य यशवंत पालकर यांनी प्रास्ताविक केले. ऐश्वर्या कवडे यांनी सूत्रसंचालन केले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
12/11/2022 Page No. 2